



**मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी ऑनलाईन उद्घाटकीय मनोगत व्यक्त करताना श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली येथील मराठी विभागप्रमुख प्रा. विजय शिंदे**




**मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी ऑनलाईन उद्घाटकीय मनोगत व्यक्त करताना श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली येथील मराठी विभागप्रमुख प्रा. विजय शिंदे**



वाचन प्रेरणा दिन अर्थात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना
महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. श्रीमंत राजे विजयसिंह जाधव



वाचन प्रेरणा दिन अर्थात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त अभिवादन प्रसंगी
महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. श्रीमंत राजे विजयसिंह जाधव व सौ. छायाराजे विजयसिंह जाधव




वाचन प्रेरणा दिन अर्थात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेली ऑनलाइन पुस्तके




वाचन प्रेरणा दिन अर्थात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेली ऑन

नाव :- ऋतुजा गणेश मस्के
वर्ग :- Bsc-II

# महात्मा गांधी : एक आदर्श व्यक्तिमत्व

आपला भारत देश हा महान पुरूषांचा, समाजसुधारकांचा देश म्हणून ओळखला जातो. कारण या महान पुरूषांनी आपल्या देशासाठी अशी आदर्श कामे केली आहेत जी आजही आपल्या सर्वांच्या लक्षात आहेत. अनेक महान पुरूषांनी आपल्या भारत देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आत्मसमर्पण केले आहेत. त्या सर्वांपैकी महात्मा गांधी हे एक होते. महात्मा गांधी हे एक युगपुरूष होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण केले.

महात्मा गांधीचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ साली गुजरातमधील पोरबंदर या ठिकाणी झाला. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद गांधी आणि आईचे नाव पुतळीबाई असे होते. त्यांचे वडील हे पोरबंदर येथे दिवाण म्हणून काम करत असत. त्यांच्या आजोबांचे नाव उत्तमचंद गांधी असे होते. अत्यंत धार्मिक वातावरणातील बालपणाचा मोठा प्रभाव गांधीजींच्या आयुष्यावर दिसून येतो. आईमुळे मोहनदासांवर जैन संकल्पना आणि प्रथांचा प्रभाव होतो.

महात्मा गांधीजीचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी कस्तुरबाशी झाला. ही त्यांची विद्यार्थी दशा होती. महात्मा गांधी यांनी आपले प्राथमिक शिक्षण पोरबंदर येथे पूर्ण केले. सन १८८६ साली ते मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. शालेय शिक्षण संपवून वयाच्या एकोणिसाव्या वर्षी इ.स १८८८ मध्ये ते

इंग्लंडमध्ये लंडनला युनिव्हर्सिटी कॉलेज मध्ये वकिलीचे शिक्षण घेण्यास गेले. तेथे जाऊन त्यांनी बॅरिस्टरची पदवी मिळाली. सन १८९१ मध्ये देशात परत आल्यावर त्यांनी आपल्या वकिलीला सुरुवात केली. परंतू त्यांना दक्षिण आफ्रिकेत जावे लागले. तेथे जाऊन ते वकिली करू लागले. तेथे भारतीयांवर होत असलेला अन्याय त्यांनी पाहिला. त्यातुनच अहिंसा आणि असहकार तत्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधीजींनी प्रथम दक्षिण आफ्रिकेमध्ये केला. त्यामध्ये ते यशस्वी झाले.

इ.स १९१५ मध्ये गांधीजी कायमसाठी भारतात परत आले. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाल्यावर ते राष्ट्रीय सभेचे प्रमुख नेते बनले. सन १९१८ मध्ये गुजरातच्या खेडा गावात भीषण पूर आला होता. त्यामुळे खेडा गावात दुष्काळची समस्या निर्माण झाली होती. एवढ्या गंभीर संकटांना तोंड देऊन सुध्दा ब्रिटिश सरकारने भारतीय लोकांना कोणत्याही प्रकारची सुट दिली नाही, तसेच त्यांना मदत करण्यास सुध्दा तयार नव्हते. हे पाहताच गांधीजींनी अहिंसक असहकार चळवळ सुरु केली. ज्यामुळे शेवटी ब्रिटिश सरकारला लोकांच्या मागण्या मान्य कराव्यात लागल्या. म्हणून ही चळवळ 'खेडा सत्याग्रह' म्हणून ओळखली जाते.

गांधीजींनी असहकार, अहिंसा आणि शांततामय शस्त्र म्हणून इंग्रजांविरुद्ध वापरले. पंजाबमध्ये जालियनवाला बाग हत्याकांडानंतर लोकांच्या क्रोधाचा उद्रेक झाला. आणि अनेक ठिकाणी हिंसक विरोध झाले. गांधीजींनी जालियनवाला बाग हत्याकांड तसेच हिंसक गोष्टींचा निषेध केला. त्यानंतर गांधीजींनी आपले सर्व लक्ष पूर्ण स्वराज्यावर केंद्रित केले. त्यांच्या पूर्ण स्वराज्याच्या कल्पनेत पूर्ण वैयक्तिक, धार्मिक आणि राजकीय स्वातंत्र्य समाविष्ट होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या समर्थनार्थ चरख्यावर सूत कातावे असा गांधीजींचा आग्रह होता..

महात्मा गांधीजींना त्यांच्या महान कार्यामुळे आणि महानतेबद्दल 'महात्मा' असे म्हटले जाते. जे त्यांनी आपले संपूर्ण आयुष्यभर केले. महात्मा गांधी हे एक स्वतंत्रता सेनानी आणि अहिंसक कार्यकर्ते होते. त्यांनी ब्रिटिश राजवटीपासून भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी पुढाकार घेऊन आयुष्यभर अहिंसेचा अभ्यास केला.

महात्मा गांधी हे एक महान व्यक्तिमत्व असणारे थोर पुरुष या भारत देशाला लाभले होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य या भारत मातृभूमीसाठी अर्पण केले. महात्मा गांधीजींनी दाखवून दिले की, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या मार्गाने सुध्दा देशाला स्वातंत्र्य मिळवून देता येते. त्यांची शिकवण ही संपूर्ण देशाला प्रेरणादायी ठरली. 'राष्ट्रपिता' म्हणून सर्वश्रेष्ठ बहुमान गांधीना प्राप्त झाला.

अशा प्रकारे महात्मा गांधी हे आदर्श व्यक्तिमत्व होते. त्यांनी आपलं पूर्ण आयुष्य भारताच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण केलं. महात्मा गांधीजी हे महान असे व्यक्तिमत्व होते.

# * निबंध *

## * महात्मा गांधी एक आदर्श व्यक्तिमत्व *

भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार असे महात्मा गांधी यांना म्हणता येईल. म्हणूनच त्यांना राष्ट्रपिता असा दर्जा देण्यात आला आहे राष्ट्रपिता असा दर्जा देण्यात आला आहे. आपल्या अहिंसात्मक आंदोलनच्या माध्यमातून या देशाला स्वांतत्र्य मिळवुन देणाऱ्या महात्माजीची जन्म दोन ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. १८८८ मध्ये ते कायदयाने शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले तेथे त्यांनी बॅरीस्टर ही पदवी मिळवली

१८९१ मध्ये भारतात परतल्या नंतर त्यांनी वकिलीला सुरूवात केली पण आयुष्यात एक वळण अचानक असे आले की ते दक्षिण आफ्रिकेत गेले. तिथे जाऊन वकिली करू लागले तेथे ही जाऊन वकिली करू लागले तेथे ही ते योगायोगानेच तेथील भारती यांच्या अधिकाराच्या आंदोलनात ओढले गेले. पुढे या आंदोलनाचे नेतृत्व करून त्यांनी अहिंसात्मक आंदोलना द्वारे नेतृत्व करून त्यांनी अहिंसात्मक आंदोलना द्वारे आपले हक्क मिळविण्याचा अभिनव प्रयोग यशस्वी करून दाखवला सत्याग्रहाचा प्रयोग ही त्यांनी तेथेच केला तेथेच त्यांनी १९०३ मध्ये इंडियन ओपीनियन नावाचे वृत्तपत्र काढले सत्याग्रह शिबिराची स्थापनाही त्यांनी तेथे केली १९१४ मध्ये ते भारतात परतले १९१५ पासून ते महात्मा म्हणून विख्यात झाले १९१७ मध्ये त्यांनी चंपारण येथील शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आंदोलन केले पुढे १९२०-२२ मध्ये अहिंसक असहकार आंदोलन १९३०-३२ दरम्यान दांडी येथील मीठाचा सत्याग्रह आणि सविनय कायदे भंग १९४०-४२ दरम्यान व्यक्तिगत सत्याग्रह आणि १९४२ ची भारत छोडो आंदोलन या साऱ्यात महात्मा जीचे नेतृत्व झळाळून उठले.

९ ऑगस्ट १९४२ ला त्यांनी मुंबईत करा किंवा मरा असे आवाहन जनतेला केले त्यांनी त्यानंतर अटक झाली त्यांना पुण्यात आगाखान पॅलेस येथे ठेवण्यात आले तेथे त्यांना मे १९४४ ला त्यांना सोडून आण्यात आले त्यांनी अनेकदा उपोषणाचा मार्ग अवलंबून ब्रिटिश सरकारला जेरीला आणले. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन अखेर पंधरा ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले पण त्यावेळी हा महात्मा नोआखालीत सुरू असलेली जातीय दंगल विझवण्यासाठी काम करीत होता लोकांसाठी आयुष्याचा होम करणाऱ्या महात्मा गांधींना एका असंतुष्टाने तीस जानेवारी १९४८ मध्ये गोळी घातली त्यानंतर त्यांचे निधन झाले महात्मा गांधी केवळ अट्टल राजकारणीच नव्हते तर जीवनाच्या विविध पैलूवर त्याचा चांगलाच प्रभाव होता.

ते चांगले समाज सुधारक, कुशल अर्थज्ञ होतेच या बरोबरच त्याचा उत्कृष्ट जनसंपर्क होता ज्या वेळी मुद्रण माध्यम इंग्रजांच्या आधिपत्या खाली होते. अशा वेळी गांधीजींनी आपल्या विचारांची लाट गावा-गावात आणि शहराशहरात पोहचवली त्यांच्या सरळ, साध्या व सोप्या भाषेचा प्रभाव लाखो लोकांवर पडत असे इंडियन ओपिनियन मध्ये गांधीजींनी लिहिले आहे व्यक्ति स्वतः प्रमुख संघर्ष आतून असतो ती आतील ताकती प्रेरणा देत असते हे कार्य वर्तमान पत्र चांगल्या प्रकारे करू शकतात. एका पत्रकाराच्या रूपाने त्यांनी सामाजिक आर्थिक व राजकीय विचार मांडले त्यामुळे तत्कालीन बुद्धिमान वर्गाने म्हणजे वकील शिक्षक विद्यार्थी पत्रकार, ट्रेड युनियनचे नेते आदींनी गांधीजींना आपले प्रेरणा स्थान मानले त्यांनी सुरू केलेल्या 'हरीजन' वृत्तपत्राचा उद्देशच ग्रामीण भागातील लोकांचे भले करणे आणि त्यांच्या जीवना मध्ये सुधारणा करणे होता. यावर येणारी पिढी क्वचितच विश्वास ठेवेल.




मराठी विभागाद्वारे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित ऑनलाईन अतिथी व्याख्यान




मराठी विभागाद्वारे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित ऑनलाईन अतिथी व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना म.रा.सा.सं. मंडळ माजी विभागीय समन्वयक (औरंगाबाद)